# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ३०/०८/२०२४ (शुक्रवार) दुपार

---

### फसवणूक करणाऱ्या आरोपीस नरखेड पोलीसांनी केली अटक

दिनांक ०६/०३/२०२४ रोजी फिर्यादी नामे– सागर बबनराव गतफने, वय ३९ वर्ष, रा. पंचायत समिती कार्यालय नरखेड याने वैयक्तिक लोनची आवश्यकता असल्याने त्या दरम्यान **आरोपी शशांक विनोद दारकोंडे, वय ३५ वर्ष रा. नागपूर** याने वैयक्तिक लोन काढुन देतो असे फिर्यादीला सांगुन फिर्यादीचा विश्वास संपादन करून फिर्यादीचा विश्वासघात करून फिर्यादीकडुन फिर्यादीचे सहीचे कोरे चेक हस्तगत केले व फिर्यादीचा लोन मंजूर झाल्यावर फिर्यादीचे पैसे अकाउंटला आल्यावर फिर्यादीने दिलेले सहीचे कोरे चेकचा वापर करून फिर्यादीचे अकाउंटमधुन ०४,६२,३७२/–रू. काढुन फिर्यादीची फसवणूक केली. यावरून पोस्टे नरखेड येथे अप. क्र. १३९/२४ कलम ४०६, ४२० भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील आरोपीचा शोध घेवून गुन्हा उघड करणे संदर्भात तत्काळ पो.स्टे. नरखेड येथील तपास पथक रवाना होवून आरोपीचे वर्णनावरून तसेच गोपनिय माहिती वरून आरोपीचा शोध घेतला असता **आरोपी नामे–शशांक विनोद दारकोंडे, वय ३५ वर्ष रा. नागपूर** याला इंदोर मध्यप्रदेश येथुन ताब्यात घेवून त्याचेकडून सोन्याची चैन वजन अंदाजे १५.९० ग्रॅम आणि अंगठी वजन अंदाजे १४.९७० ग्रॅम एकुण किंमती एकुण २,५०,०००/– रू. नगदी १,४५,०००/–रू. असा एकुण ३,९५,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. उर्वरीत रक्कम ६७,३७२/–रू. आरोपीने खर्च केले. नमुद आरोपीला पोस्टे. ला आणून दिनांक २६/०८/२०२४ रोजी अटक करण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल श्री. बापू रोहम यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे नरखेड प्रभारी ठाणेदार सपोनि शिवाजी नागवे, पोहवा अरूण भेंडे, हरीनारायण चव्हाण, नापोशि सतिश राठोड यांनी पार पाडली.

## दुकानातील चोरी करणाऱ्या आरोपीतांना सावनेर पोलीसांनी केले अटक

यातील **आरोपी क्र १**) **हेमराज चितामन पटोळे वय ३० वर्ष रा. वार्ड क्र ०२ पाटनसावंगी ता. सावनेर** हा फिर्यादी नामे— भोजराज जग़नाथजी भुते वय ५७ वर्ष रा. पाटणसावंगी यांचे न्यु ब्रांन्ड व्हेरायटी कपडयाचे दूकानात मागील ६ ते ७ वर्षा पासून नोकर असून त्याने **आरोपी क्र. २) विजेय जयशिग सराटे वय ३० वर्ष रा. वार्ड क्र. ०३ पाटनसावंगी ता. सावनेर** याच्या संगणमताने दूकाणातील १) पोपटी रंगाची साडी किंमती १३३३/— रू २) एक अबोली रंगाची साडी किंमती १३३३/— रू ३) तीन नग फूल बायाचे शर्ट प्रत्येकी ६९९/— रू प्रमाणे एकून किंमती २०९७/— रू असा एकूण ४७६३/— रू चा मुद्देमाल चोरी करून आरोपी क्र २ याने खरेदी केलेल्याा चटईचे आतील भागात लपवून चोरी करून घेवून जात असताना फिर्यादीला रंगेहात मिळून आाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे सावनेर येथे अप क्र. ७७९/२०२४ कलम ३०६, ३(५)) भा.न्या.स. अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयातील आरोपी हे गुन्हा घडल्यापासुन फरार होते. पोस्टे सावनेर येथील तपास पथक यांना मिळालेल्या गोपनीय माहिती वरून आरोपी **१**) **हेमराज चितामन पटोळे वय ३० वर्ष रा. वार्ड क्र ०२ पाटनसावंगी ता. सावनेर २) विजेय जयशिग सराटे वय ३० वर्ष रा. वार्ड क्र. ०३ पाटनसावंगी ता. सावनेर** यांना पाटणसावंगी सावनेर त्यांचे राहते घरून ताब्यात घेतले. आरोपी क्र. ०१ हा दुकानातील मालाची चोरी करून बाहेर विक्री करीत होता असे आरोपीने विचारपुस दरम्यान सांगितले. आरोपीतांना दि. २९/०८/२०२४ रोजी अटक करण्यात आली.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोनि महेश पाटील, सपोनि मंगला मोकासे, पोहवा राजेश हावरे, नापोशि कपोल तभाने, रविंद्र चटप, रंजन काबंळे यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**